**नियमित दिवाणी दावा क्र. ४३९/२०१६ मध्ये निशाणी क्र. ४७ कडील अर्जावर आदेश.**

१) प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादीतर्फे त्यांच्याविरुध्द निशाणी क्र. १ वर दिनांक २९/१०/२०२५ रोजी पारीत करण्यात आलेला पुरावा बंदचा आदेश रद्द करुन प्रस्तुत प्रकरणात पुरावा देण्यास परवानगी मिळण्याकरीता दाखल केला आहे.

२) प्रस्तुत अर्जास वादीचे म्हणणे घेण्यात आले आहे. वादीतर्फे दिलेल्या म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की, प्रतिवादीस कोर्टाचे समन्स लागल्यापासून प्रतिवादीचे कंडक्ट चुकीचे आहे. प्रतिवादीला अनेक संधी दिलेल्या आहेत. त्यामुळे अर्ज नामंजूर करावा.

३) प्रस्तुत अर्जाच्या कामी दोन्ही पक्षांतील विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला. रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

४) दोन्ही पक्षांतील विद्वान वकीलांचा युक्तिवाद ऐकला असता व रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसून येते की, प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादीने त्यांचा पुरावा सादर न केल्याने प्रतिवादीचा पुरावा बंद करण्यात आल्याबाबत निशाणी क्र. १ वर दिनांक २९/१०/२०२५ रोजी आदेश पारीत केला आहे. त्यानंतर प्रतिवादीने दिनांक ०३/१२/२०२५ रोजी प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे. अर्जातील नमूद कारणे विचारात घेता व प्रकरणाचे स्वरुप विचारात घेता माझ्या मते प्रतिवादीला या प्रकरणात त्यांचा पुरावा सादर करण्याची संधी देऊन प्रस्तुत प्रकरण गुणवत्तेच्या आधारे निकाली काढणे न्यायाचे व उचित आहे. त्यामुळे वरील नमूद कारणांमुळे माझ्या मते न्यायाच्या दृष्टीने प्रस्तुत अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब हे न्यायालय न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारीत

करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१) प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येतो व त्यानुसार निशाणी क्र. १ वर दिनांक २९/१०/२०२५ रोजी प्रतिवादीविरुध्द पारीत केलेला पुरावा बंदचा आदेश रद्द करुन प्रतिवादीला त्यांचा पुरावा सादर करण्यास परवानगी देण्यात येते.

२) वरीलप्रमाणे न्यायालयात आदेशाचे कथन करुन घोषीत करण्यात आला.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PANDURANG LIMBAJI GHULE
Date: 2026.01.15 15:13:34 +0530

(पां. लिं. घुले)

दिनांक– १५/०१/२०२६ २रे सह दि. न्या. व. स्तर, कराड.